पुढारी 3 APR 2016
जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभाग आणि प्रगत संगणन विकास केंद्र (सी-डॅक) या दोन महत्त्वपूर्ण संस्थांमध्ये शुक्रवारी प्रा. रजत मोना व कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. करारावर विद्यापीठातर्फे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व सी-डॅकच्या वतीने सचिव कर्नल अनुपकुमार खरे यांनी स्वाक्षरी केल्या. यावेळी सी-डॅकचे डायरेक्टर जनरल प्रा. रजत मोना यांनी विद्यापीठात आयसीटी अनुषंगाने सुरू असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक केले.**

# शिवाजी विद्यापीठ-सी डॅकमध्ये करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

माहिती तंत्रज्ञानाचा देश अशी भारताची जगभर ओळख प्रस्थापित करण्यात 'सी-डॅक'ने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. विद्यापीठानेही मुडलसारख्या आधुनिक शिक्षण पद्धतीचा अंगिकार केला आहे. त्याबरोबरच केवळ विज्ञान विभागच नव्हे, हिंदीसारख्या भाषा अधिविभागातही आयसीटीविषयक अतिशय उत्तम काम सुरू असल्यामुळे विद्यापीठासोबत सहकार्य संबंध प्रस्थापित केले आहेत. हा करार दोन्ही संस्थांच्या भावी शैक्षणिक व माहिती तंत्रज्ञानविषयक सहकार्य वृद्धीमध्ये मोलाची कामगिरी बजावेल, असा विश्वास प्रा. मोना यांनी व्यक्त केला.




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ संगणकशास्त्र अधिविभाग आणि प्रगत संगणन विकास केंद्र (सी-डॅक) सामंजस्य करारप्रसंगी सी-डॅकचे डायरेक्टर जनरल प्रा. रजत मोना, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. डी.आर. मोरे, डॉ. आर. के. कामत, डॉ. हेमंत दरबारी, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. के. एस. ओझा, डॉ. यू.आर. पोळ, डॉ. व्ही. एस. कुंभार आदी.**
**(छाया : पप्पू अत्तार)**

कुलगुरू डॉ. शिंदे यांनी विद्यापीठाच्या दृष्टीने हा ऐतिहासिक क्षण असल्याचे सांगितले. विद्यापीठ स्तरावरील कॉम्प्युटिंगला काही प्रमाणात मर्यादा येतात. त्यामुळे या क्षेत्रातील 'सी-डॅक' या दिग्गज कंपनीसोबत सामंजस्य करार करण्याची भूमिका विद्यापीठाने घेतली. दोन्ही संस्थांमध्ये ज्ञान व माहितीचे होणारे आदान-प्रदान विद्यार्थी, शिक्षक, संशोधक या सर्वांच्या दृष्टीने उपयुक्त ठरणार आहे. यावेळी 'सी-डॅक'चे सह-संचालक महेश कुलकर्णी यांनी 'सी-डॅक'च्या वाटचालीचा आढावा घेतला. संगणकशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. आर. के. कामत यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. ध्वनिचित्रफितीच्या माध्यमातून त्यांनी विभागाच्या वाटचालीचा आढावा घेतला. प्रभारी कुलसचिव डॉ. शिंदे यांनी आभार मानले. याप्रसंगी सी-डॅकचे कार्यकारी संचालक डॉ. हेमंत दरबारी, डॉ. डी.टी. शिर्के, डॉ. ए.एम. गुरव, डॉ. पद्मा पाटील, डॉ. के.एस. ओझा, डॉ. यू. आर. पोळ, डॉ. व्ही. एस. कुंभार यांच्यासह संगणकशास्त्र अधिविभागातील शिक्षक, संलग्नित महाविद्यालयांतील शिक्षक तसेच कोल्हापूर आयटी असोसिएशनचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

### विद्यार्थ्यांना मिळणार अत्याधुनिक प्रशिक्षण

सामंजस्य करारामुळे संगणकशास्त्राच्या विद्यार्थ्यांना मूलभूत ज्ञानाबरोबरच पूरक ज्ञान उपलब्ध होणार आहे. बीग डाटा ॲनालिसीस, फ्री अँड ओपन सोर्स डाटा यनिंग एम्बेडेड सिस्टीम, वायरलेस सेन्सर नेटवर्क, व्ही.एल.एस.आय. डिझाईन, सॉफ्टवेअर इंजिनिअरिंग, मल्टी लिंग्युअल टेक्नॉलॉजी यांसारख्या अत्यावश्यक संशोधन क्षेत्रांसंदर्भातील देवाण-घेवाण होणार आहे. संगणकशास्त्र अधिविभागातील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञान कंपनीत पुणे येथे सी-डॅक प्रकल्प तयार करण्याचे प्रशिक्षण मिळणार आहे.

महाराष्ट्र टाईम्स
3 APR 2016
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'चलननीती'तून आर्थिक बोध

## प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांचे मत; जे. एफ. पाटील यांच्या पुस्तकाचे प्रकाशन

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

देशाच्या आर्थिक विकासातील चढ उतार व तात्कालिन बदल सर्वसामान्यांना समजण्यासाठी 'चलननीती' पुस्तक मार्गदर्शक ठरेल, त्यांचे लेखन कार्य समाजशास्त्रीय अर्थशास्त्राचे आकलन व शिक्षण देणारे आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांनी व्यक्त केले. शिवाजी विद्यापीठाचा अर्थशास्त्र अधिविभाग आणि इचलकरंजी येथील समाजवादी प्रबोधिनीच्यावतीने आयोजित ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील लिखित 'चलननीती' या पुस्तकाचे प्रकाशनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते.

डॉ. एन. डी. पाटील म्हणाले, देशाच्या सर्वांगीण विकासाठी सरकारकडून विविध धोरणे व योजनांची निर्मिती केली जाते. या धोरणांचा परिणाम देशाच्या विकासासह सर्वसामान्य माणसांच्या राहणीमानावर होतो. त्यामुळे सरकारी धोरणांचा अर्थशास्त्रीय दृष्टिकोनातून सर्वसामान्य जनतेला समजेल, अशा प्रकारे लेखन करण्याचे कार्य डॉ. जे. एफ. पाटील याचे अखंड चालू असते. त्यांनी 'चलननीती' पुस्तकाच्या माध्यमातून तत्कालीन परिस्थितील सरकारी धोरणे, त्यांचे सर्वसामान्य जनतेवर घडून येणारे दूरगामी परिणाम आणि आर्थिक घडामोडींचे सखोल विवेचन केले आहे. अध्यक्ष डॉ. कुलगुरू देवानंद शिंदे म्हणाले, सर्वसामान्य जनतेला कळेल, समजेल व उमजेल अशा भाषेत अर्थशास्त्राचे विवेचन लेखक डॉ. जे. एफ. पाटील यांनी केले आहे. चलननीती पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी तात्कालिन चलनविषयक धोरणांचा चिकित्सक पद्धतीने उलघडा केला आहे. लेखक डॉ. जे. एफ. पाटील यांनी लेखन कार्याचा प्रवास उलघडला. या वेळी कमल पाटील, ज्येष्ठ विचारवंत प्रा. डॉ. ज. रा. दाभोळे आदी उपस्थित होते. प्रसाद कुलकर्णी यांनी प्रास्ताविक केले. अर्थशास्त्र विभागाचे विभागप्रमुख डॉ. व्ही. बी. ककडे यांनी पुस्तक परिचय करुन दिला. डॉ. एम. एस. देशमुख यांनी सूत्रसंचालन केले. शशिकांत पंचगल्ले यांनी आभार मानले.



**ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील लिखित 'चलननीती' या पुस्तकाचे प्रकाशन ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांच्या हस्ते शिवाजी विद्यापीठात झाले. या वेळी डॉ. व्ही. बी. ककडे, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, डॉ. ज. रा. दाभोळे.**

पुढारी

3 APR 2016

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# करव्यवस्थेमधील शिथिलतेमुळेच आर्थिक विकास कुंठीत

## प्रा.डॉ.एन.डी. पाटील यांचे मत : 'चलननीती' पुस्तकाचे प्रकाशन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

आर्थिक शिस्तही सर्व अर्थव्यवस्थेचा कणा असून तूट ही मधूमेहासारखी असते. करव्यवस्थेमधील शिथिलतेमुळेच आर्थिक विकास व उत्पन्न वाढ कुंठीत होत आहे. देशाच्या आर्थिक विकासातील चढ-उतार व तत्कालीन बदल सर्वसामान्यांना समजण्यासाठी 'चलननीती' पुस्तक उपयुक्त ठरेल, असे मत ज्येष्ठ समाजवादी विचारवंत प्रा.डॉ. एन. डी. पाटील व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठ अर्थशास्त्र अधिविभाग व समाजवादी प्रबोधनी, इचलकरंजी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील लिखित 'चलननीती' या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू प्रा. डॉ. देवानंद शिंदे होते.

सीमाप्रश्नाचा संदर्भ घेऊन बोलताना ते म्हणाले, 'चलननीती' पुस्तकाची प्रस्तावना गोखले इन्स्टिट्यूटचे प्रा.राजेश परचुरे यांनी लिहिली आहे. ते बेळगाव प्रश्नासंदर्भात न्यायालयीन भूमिका मांडण्यासाठी गेले आहेत. बेळगाव सीमाप्रश्न १९५६ पासून प्रलंबित असून त्याबाबत आता सर्व प्रकारची ९० हजार कागदपत्रे संणगकीय पद्धतीने तयार केली आहेत. महाजन आयोगाच्या शिफारशींप्रमाणे कर्नाटक आपली भूमिका बदलायला तयार असला तरी या प्रश्नासंदर्भात न्यायालयीन प्रक्रिया अंतिम टप्प्यात असल्याचे ते म्हणाले.



**कोल्हापूर : जेष्ठ अर्थतज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील लिखित 'चलननीती' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी प्रा.डॉ.एन.डी.पाटील, कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे. डॉ. व्ही. बी. ककडे, डॉ. जे. एफ.पाटील, डॉ. भारती पाटील, डॉ. ज. रा. दाभोळे आदी. (छाया : पप्पू आतार)**

अध्यक्षीय मनोगतात कुलगुरू डॉ. शिंदे म्हणाले, अर्थशास्त्रीय नियोजन घरापासून होते. तो अर्थशास्त्राचा पाया असतो. सर्वसामान्य जनतेला जोपर्यंत अर्थशास्त्र कळणार नाही तोपर्यंत त्यांना आर्थिक धोरणांचा फायदा घेता होणार नाही, तसेच योजनेत सहभाग वाढणार नाही. त्यामुळे सर्वसामान्य जनतेला कळेल, समजेल व उमजेल अशा भाषेत अर्थशास्त्राचे विवेचन करण्याची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आर्थिक तूट भरून काढता येईल. अर्थशास्त्रीय विचार समाजापर्यंत पोहोचविण्याचे कार्य अर्थशास्त्राचे लेखक डॉ. जे. एफ. पाटील यांनी केले आहे. चलननीती पुस्तकाच्या माध्यमातून त्यांनी तात्कालीन चलनविषयक धोरणांचा चिकित्सक पद्धतीने उलगडा केला असल्याचे डॉ. शिंदे म्हणाले. यावेळी डॉ. जे. एफ. पाटील यांनी लेखन कार्याचा प्रवास उलगडला.

प्रास्ताविक प्रसाद कुलकर्णी यांनी केले. अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. डॉ. व्ही. बी. ककडे यांनी पुस्तक परिचय करून दिला. सूत्रसंचालन प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले.आभार शशिकांत पंचगल्ले यांनी मानले. यावेळी प्रा. डॉ. ज. रा. दाभोळे, प्रा.डॉ. जे.एस.पाटील, प्रा.डॉ.भारती पाटील, प्रा.डॉ.अनिल पडोशी, प्रा.डॉ.भालबा विभूते, प्रा.डॉ. पी. ए. कोळी, प्रा.डॉ. एन. आर .साळवे, प्रा.डॉ. जी. एस. कुलकर्णी, प्रा.डॉ. आर. जी. दंडगे, प्रा.डॉ. एम. एस. देशमुख, प्रा.सुभाष कोंबडे आदी उपस्थित होते.